# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पेन्टेकॉस्ट रविवार

## सांयप्रार्थना

*महत्वाची सूचना ः सदर प्रार्थना ही ख्रिस्तसभेची अधिकृत प्रार्थना आहे. कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता ही प्रार्थना आपण आपल्या कुटुंबात एकत्रित करावी ही नम्र विनंती.*

**चरण:** हे देवा, आमच्या सहाय्यास ये.

**प्रतिसाद:** हे प्रभो, माझ्या सहाय्यास धावून ये.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**गीत ः** पवित्र आत्म्याचे गीत

**प्रतिगीत १:** परमेश्वराच्या आत्म्याने संपूर्ण जग भरले आहे, आल्लेलुया.

**स्तोत्र ११० : १ - ५, ७**

**मा**झ्या प्रभूला परमेश्वर म्हणतो,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत
तू माझ्या उजवीकडे बैस.

**प**रमेश्वर तुझे बलवेत्र सियोनेतून पुढे नेईल;
तो म्हणतो, तू आपल्या शत्रूवर प्रभुत्व कर.

**तु**झ्या पराक्रमाच्या दिवशी तुझे लोक संतोषाने पुढे होतात,
पावित्र्याने मंडित झालेले तुझे तरूण
तुला पहाटेच्या दहिवरासारखे आहेत.

**प**रमेश्वराने शपथ वाहिली आहे
आणि ती तो बदलणार नाही;
ती अशी की, मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे
तू युगानुयुग याजक आहेस.

**तु**झ्या उजव्या हाताकडे असलेला प्रभू
आपल्या क्रोधाच्या दिवशी राजांचा बीमोड करील;

**मा**र्गाने चालत असता तो ओहोळातले पाणी पिईल;
आणि आपले डोके वर करील.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: परमेश्वराच्या आत्म्याने संपूर्ण जग भरले आहे, आल्लेलुया.

********

प्रतिगीत २: हे प्रभो, तुझ्या येरूशलेमच्या पवित्र मंदिरातून तुझे सामर्थ्य पाठव आणि आम्हामधील तुझे कार्य पूर्णतेस ने, आल्लेलुया.

स्तोत्र ११४

**इ**स्राएल मिसर देशातून निघाला,
याकोबाचे घराणे परकी भाषा बोलणाऱ्या लोकांतून निघाले;
तेव्हा यहूदा त्याचे पवित्रस्थान झाला,
इस्राएल त्याचे राज्य झाला.

**हे** पाहून समुद्र पळाला;
यार्देन मागे हटली.
पर्वतांनी मेंढयांसारख्या आणि टेकडयांनी कोकरांसारख्या उडया मारल्या.

**हे** समुद्रा, तुला काय झाले म्हणून तू पळतोस?
हे यार्देने, तुला काय झाले म्हणून तू मागे हटतेस?
अहो पर्वतांनो, तुम्हाला काय झाले
म्हणून तुम्ही मेंढयांसारख्या उडया मारता?
अहो टेकडयांनो, तुम्हाला काय झाले
म्हणून तुम्ही कोकरांसारख्या उडया मारता?

**हे** पृथ्वी, तू प्रभूसमोर, याकोबाच्या देवासमोर, थरथर काप.
तो खडक पालटून पाण्याचे तळे करतो,
गारेचा खडक पालटून पाण्याचा झरा करतो.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत २:** हे प्रभो, तुझ्या येरूशलेमच्या पवित्र मंदिरातून तुझे सामर्थ्य पाठव आणि आम्हामधील तुझे कार्य पूर्णतेस ने, आल्लेलुया.

*********

**प्रतिगीत ३:** ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि बोलू लागले, आल्लेलुया.

**प्रकटी. १९ :१, २, ५ - ७**

आल्लेलुया, तारण सामर्थ्य व गौरव ही आमच्या देवाची आहेत. (प्र. आल्लेलुया)

त्याचे न्यायनिर्बंध सत्याचे व नीतीचे आहेत. प्र. आल्लेलुया (आल्लेलुया)

आल्लेलुया, अहो त्याच्या सर्व दासांनो,
आमच्या परमेश्वराचे स्तवन करा (प्र. आल्लेलुया)

त्याची भीती बाळगणाऱ्या सर्व लहान थोर दासांनो म्हणा प्र. आल्लेलुया (आल्लेलुया)
आल्लेलुया, कोकराचे लग्न निघाले आहे (प्र. आल्लेलुया)

आणि त्याच्या नवरीने स्वत:ला सजविले आहे प्र. आल्लेलुया (आल्लेलुया)

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३ ः** ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि बोलू लागले, आल्लेलुया.

**शास्त्रवाचन** इफिस ४: ३ - ६

आत्म्याच्याद्वारे घडून आलेले ऐक्य शांतीच्या बंधनाने राखावयास झटत जा; तुम्हास झालेल्या पाचारणापासून निर्माण होणारी आशा जशी एकच आहे, तसे शरीरही एकच व आत्मा एकच आहे. प्रभू एकच, विश्वास एकच, बाप्तिस्मा एकच. सर्वांवर आणि सर्वांमधून आणि सर्वांच्या ठायी असलेला देव जो सर्वांचा पिता तोही एकच आहे.

## लघु प्रतिसाद

प्रतिसाद: परमेश्वराच्या आत्म्याने संपूर्ण जग भरलेले आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
प्रतिसाद: परमेश्वराच्या आत्म्याने संपूर्ण जग भरलेले आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
चरण: तो सर्व गोष्टींना जीवन देतो आणि उच्चारलेला प्रत्येक शब्द समजतो.
प्रतिसाद: परमेश्वराच्या आत्म्याने संपूर्ण जग भरलेले आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: परमेश्वराच्या आत्म्याने संपूर्ण जग भरलेले आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** हा पेन्टेकॉस्टचा दिवस आहे, आल्लेलुया. आज शिष्यांवर अग्नीच्या रूपाने पवित्र आत्मा उतरला आणि त्याने त्यांना विशेष कृपादाने दिली. जो विश्वास ठेवतो आणि बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल याची घोषणा करण्यासाठी त्याने त्यांना जगात पाठविले.

**मरियेचे स्तोत्र:** (लूक १:४६-५५)

'माझा जीव प्रभूला' थोर मानितो
आणि 'देव जो माझा तारणारा'
त्याच्यामुळे माझा आत्मा 'उल्हासला आहे;'

कारण 'त्याने' आपल्या 'दासीच्या दैन्यावस्थेचे अवलोकन केले आहे.'
पाहा, आतापासून सर्व पिढया मला धन्य म्हणतील;

कारण जो समर्थ आहे,
त्याने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत;
आणि 'त्याचे नांव पवित्र आहे,'
आणि जे 'त्याचे भय धरितात,
त्यांच्यावर त्याची दया पिढयान्‌पिढया आहे.'

त्याने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे;
जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने 'गर्विष्ठ आहेत
त्यांची त्याने दाणादाण केली आहे.'

'त्याने अधिपतींस' राजसनांवरून 'ओढून काढिले आहे,'
'त्याने भुकेलेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे,'
व 'धनवानांस रिकामे लावून दिले आहे.'

आपल्या पूर्वजांस' त्याने सांगितले 'त्याप्रमाणे आब्राहाम'
व त्याचे 'संतान ह्यांच्यावरील दया' सर्वकाळ 'स्मरून
त्याने आपला सेवक इस्त्राएल ह्याला साहाय्य केले आहे.'

पिता पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
जसा प्रारंभी होता तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** हा पेन्टेकॉस्टचा दिवस आहे, आल्लेलुया. आज शिष्यांवर अग्नीच्या रूपाने पवित्र आत्मा उतरला आणि त्याने त्यांना विशेष कृपादाने दिली. जो विश्वास ठेवतो आणि बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल याची घोषणा करण्यासाठी त्याने त्यांना जगात पाठविले.

## विनंत्या

प्रतिसाद: हे पित्या, तुझ्या पवित्र आत्म्याला तुझ्या ख्रिस्तसभेत पाठव.

पिता आपल्याबरोबर आहे हे आपल्याला ठाऊक आहे कारण त्याने आपल्याला आत्मा दिलेला आहे. ह्या आत्मविश्वासाने आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या. प्रतिसाद: हे पित्या, तुझ्या पवित्र आत्म्याला तुझ्या ख्रिस्तसभेत पाठव.

हे पित्या, तू पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने सर्व मनुष्यांना एकत्र करू इच्छितो - सर्व श्रद्धावंत एकदिलाचे व एकजिवाचे व्हावेत असे कर. प्रतिसाद: हे पित्या, तुझ्या पवित्र आत्म्याला तुझ्या ख्रिस्तसभेत पाठव.

तू पृथ्वीला प्रेमाने भरून टाकण्यासाठी तुझ्या पवित्र आत्म्याला पाठविलेस - मानवाने न्याय व शांतीचा समाज उभारावा असे कर. प्रतिसाद: हे पित्या, तुझ्या पवित्र आत्म्याला तुझ्या ख्रिस्तसभेत पाठव.

हे प्रभो परमेश्वरा, तू सर्वांचा पिता आहेस. तुझ्या सर्व विखुरलेल्या लेकरांना श्रद्धेच्या ऐक्याने एकत्र आण - तुझ्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने जगात नवसंजीवनी पसरू दे. प्रतिसाद: हे पित्या, तुझ्या पवित्र आत्म्याला तुझ्या ख्रिस्तसभेत पाठव.

तुझ्या पवित्र आत्म्याच्या कार्याद्वारे आमच्या मनाचे नूतनीकरण कर - आजाऱ्यांना बरे कर. दु:खितांचे सांत्वन कर आणि सर्व मनुष्यांचे तारण कर. प्रतिसाद: हे पित्या, तुझ्या पवित्र आत्म्याला तुझ्या ख्रिस्तसभेत पाठव.

तुझ्या पवित्र आत्म्याद्वारे तू तुझ्या पुत्राला मरणातून पुन्हा उठविलेस - जेव्हा आम्ही तुझ्या राज्यात येऊ तेव्हा आम्हाला देखील तुझ्या पवित्र आत्म्याद्वारे पुन्हा उठव. प्रतिसाद: हे पित्या, तुझ्या पवित्र आत्म्याला तुझ्या ख्रिस्तसभेत पाठव.

**आ**मच्या स्वर्गीय बापा ...

## समारोपाची प्रार्थना

हे प्रभो परमेश्वरा, सर्व जातींतील व सर्व राष्ट्रांतील ख्रिस्तसभेला पवित्र करणारे रहस्य आज साजरे करतो. संपूर्ण मानवजातीवर तुझ्या पवित्र आत्म्याला पाठवून शुभवर्तमानाचे वैभव कर आणि तू दिलेले अभिवचन सर्व श्रद्धावंतांच्या अंतःकरणात पूर्णत्वास ने. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.